# महाराष्ट्र शासन
## सांस्कृतिक कार्य संचालनालय
## राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या **राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजना** अंतर्गत सन २०२६-२७ साठी पात्र साहित्यिक व कलाकारांकडून **दि. १ जुलै २०२६ ते दि. ३१ जुलै २०२६** या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. १६ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार कला व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना **प्रतिमहिना रु. ५,०००/- मानधन** देण्यात येते.

**पात्रतेचे निकष**

१. अर्जदाराचे वय **५० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक** असावे. दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत **१० वर्षांची शिथिलता** देण्यात आलेली आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील योगदान **किमान १५ वर्षे** असणे आवश्यक आहे.
२. साहित्य व कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाचे योगदान देणाऱ्या कलाकारांना प्राधान्याने मानधन मंजूर करण्यात येईल. तसेच वयोवृद्ध, विधवा, परित्यक्ता व दिव्यांग कलाकारांना प्राधान्य दिले जाईल.
३. अर्जदाराच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न **रु. ६०,०००/- पेक्षा अधिक नसावे**. उपजीविका प्रामुख्याने कलेवर अवलंबून असलेल्या कलाकारांना पात्रता असेल. सध्या कोणतेही नियमित उत्पन्न नसलेल्या कलाकारांचाही नियमानुसार विचार करण्यात येईल.
४. केंद्र शासन, राज्य शासन, महामंडळे किंवा इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेचा लाभ घेत नसलेले पात्र कलाकार या योजनेसाठी अर्ज करू शकतात.
५. अर्जदार हा **महाराष्ट्र राज्याचा रहिवासी** असणे आवश्यक आहे.

**अर्ज करण्याची पद्धत**

अर्जदारांनी/लाभार्थींनी महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टल https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en या संकेतस्थळावर जाऊन **दि. १ जुलै २०२६ ते दि. ३१ जुलै २०२६** या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

---

Scanned with OKEN Scanner